नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
शाखा औरंगाबाद. २०१९

जा.क्र. बांधकाम परवानगी/मौ. कुंभेफळ ता.औरंगाबाद/ग.नं. ३५० व ३५१ पै./ससंओ/ औरंगाबाद.
दि: 30/12/2017

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

विषय :- रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणे बाबत.
मौजे कुंभेफळ औरंगाबाद ग.नं. ३५० व ३५१ भूखंड क्र. १ व २ क्षेत्र ३३६३.८२० चौ.मी.
अर्जदार:- श्री. आण्णा भिकाजी मुळे व इतर

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/ मौजे कुंभेफळ, ता.औरंगाबाद/प्र. क्र.४०८, दिनांक २२.१२.२०१७.

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये मौजे कुंभेफळ औरंगाबाद ग.नं. ग.नं. ३५० व ३५१ भूखंड क्र. १ व २ क्षेत्र ३३६३.८२० चौ.मी. वर बांधकाम परवानगीचा प्रस्ताव प्राप्त आहे. सदरच्या प्रकरणाची तांत्रिक छाननी बांधकाम परवानगी अभिप्राय अपेक्षिला असल्याने बांधकाम परवानगी प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

या कार्यालयाने मौजे कुंभेफळ औरंगाबाद ग.नं. ३५० व ३५१ या जागेच्या अभिन्यासास या कार्यालयाचे पत्र क्र. १८२१ दि.२३.११.२०१७ अन्वये अंतिम मंजूरीची शिफारस महसूल विभागाकडे केली आहे. महसूल विभागाने आदेश क्र. २०१७/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे कुंभेफळ ता. औरंगाबाद/प्र.क्र.३७४, दिनांक १४.१२.२०१७ रोजी अकृषीक आदेश पारीत केलेले आहेत. संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास बांधकाम परवानगी प्रस्ताव प्राप्त झाला असता, सदरहु नकाशांची मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्याहन नियामवलीतील तरतुदी नुसार छाननी केली असता बांधकाम नकाशे हे विकास नियंत्रण नियमावलीनुसार लाल रंगाने दुरुस्ती दर्शविल्यानुसार खालील अटी व शर्तींवर बांधकाम नकाशांना रहिवास प्रयोजनासाठी बांधकाम मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. या कार्यालयाने विषयांकित प्रकरणी पत्र क्र. क्र. १८२१ दि. २३.११.२०१७ अन्वये अकृषि मंजूरी व अभिन्यासास अंतिम मंजूरीची शिफारस करतांना व तत्वतः मंजूरीची शिफारस करतांना नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
२. मा. जिल्हाधिकारी, औरगाबाद यांनी २०१७/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे कुंभेफळ ता. औरंगाबाद/प्र.क्र.३७४, दि. १४.१२.२०१७ अन्वये अकृषि परवानगी देणेचा नमूद केलेला अर्ज अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
३. प्रकरणी वास्तूशास्त्रज्ञ यांनी सादर केलेले नकाशाच्या आधारे उक्त शिफारस करण्यात येत असून प्रत्यक्षात या व्यतिरिक्त बांधकाम झाल्यास त्यास संबधीत वास्तशास्त्री जबाबदार राहील.
४. बांधकामाच्या ठिकाणी डिसप्ले बोर्ड लावणे व त्यावर खालील प्रमाणे तपशिल नमूद करणे आवश्यक राहील
   अ) जागा मालकाची डेव्हलपर्सची वास्तूतज्ञाची आणि कॉन्ट्रक्टरची नांवे व पत्ते
   ब) स.न. / सिसन/ ग.न. इत्यादी भूखंडाचा तपशिल
   क) बांधकाम परवानगी क्रमांक व दिनाक
   ड) अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र
   ई) मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणचा / कार्यालयाचा नांव व पत्ता
५. भूकंप विरोधक व्यवस्था अर्जदाराने करणे बंधनकारक राहील.
६. वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर रहिवास वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.
७. स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.
८. नियोजीत इमारती मध्ये १/१० रुमच्या क्षेत्रा इतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.
९. नियोजित इमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहीजे.
१०. नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा चालू बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
११. जमिनीच्या हद्दी, क्षेत्र व मालकी हक्काची छाननी, सहहिस्सेदारांचे संमतीपत्र याबाबत सर्व महसूल विषयक करणे बाबत्क राहील.

Seal of the Sub-Registrar Aurangabad

Building Permission V २०१७/२४९

अ.ज.ग.-६
९३०३ | २९ | ३३
२०१८